N-35

**प्रस्तावना :- भिवंडी मनपा हद्दीतील घनकच-याचा प्रश्न कायम स्वरुपी सोडविण्या करिता कल्याण-डोबिवली महानगरपालिके मार्फत तयार करण्यात आलेल्या वेस्ट टु एनर्जी या प्रकल्पा मध्ये सहभागी होणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील दैनंदिन स्वरुपात निर्माण होणारा कच-याची विल्हेवाट लावण्या करिता स्वंतत्र क्षेपण भुमी नसुन २००९ पासुन मनपा हद्दीतील मनपा मालकीचे रामनगर-चाविंद्रा येथील १० एकर असलेल्या सिटी मार्कसाठी अरक्षित असलेल्या जागेत ४०० ते ४५० टन कचरा टाकला जात आहे.

यापुर्वी कचरा विल्हेवाटी करिता मौजे दापोडा तालुका भिवंडी येथील जागा घनकचरा व्यवस्थापन (संस्करण व विल्हेवाट- डंपिंग ग्राऊंड) या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली होती.परंतु सदरची जागा मेट्रो प्रकल्प - ३ करिता मंजुर करण्यात आली असल्याचे समजले असुन कायम स्वरुपी जागा उपलब्ध होणे करिता मा.प्रधान सचिव (महसुल, मुद्रांक शुल्क व नोंदणी) यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दि.०१/२/२०१८ रोजी चर्चासभेनंतर विचार-विनिमय करुन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेस भराव भुमीसाठी (घनकचरा व्यवस्थापन) शहरापासुन १ किलो मिटर अंतरावर असलेले सर्वे नं.१३०,१३१ मौजे कालवार येथील १९.३० हेक्टर (दगडाची खदान), गुरुचरण करिता आरक्षित असलेली जागा उपलब्ध होणे करिता मा.जिल्हाधिकारी सो.,जिल्हाधिकारी कार्यालय येथे वेळोवेळी पाठपुरावा सुरु आहे.पंरतु ग्रामपंचायत NOC पत्राची प्रस्ताव अद्याप मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे.

भिवंडी निजामपुर महानगरपालिकेस कचरा विल्हेवाटी करिता डंपीग ग्राऊंड उपलब्ध नाही.त्यामुळे कचरा विल्हेवाटीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.भिवंडी शहर हे अत्यंत संवेदनशील शहर असल्याने शहरात कचरा साठल्यास त्यापासुन रोगराई निर्माण होऊन नागरीकांचे सार्वजनिक आरोग्य धोक्यात येईलच.तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणेची शक्यता सुद्धा नाकारता येणार गोळा झालेला कचरा शास्त्रोक्त पद्धतीने कच-याची विल्हेवाट लावण्या करिता स्वतंत्र क्षेपणभुमी नसल्याने कच-याची विल्हेवाटीचा प्रश्न महानगरपालिके समोर आहे.

कल्याण-डोबिवली महानगरपालिका मार्फत उभारण्यात येणा-या वेस्टु ऐनर्जी या प्रकल्पात सहभागी होणे करिता दि.२/०२/२०२२ रोजी कळविण्यात आले असता दि.१०/०२/२०२२ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पा मध्ये सहभागी होणेसाठी खालील प्रमाणे फायदे कल्याण-डोबिवली महानगरपालिकेने विषद नमुद केलेले आहेत.

घनकचरा मधुन निघणा-या आरडीएफ मटेरिअलची शास्त्रोक्तरित्या विल्हेवाट लावण्यासाठी वेस्ट टू एनर्जी हा एक चांगला पर्याय आहे यामध्ये असणा-या रिॲक्टरमध्ये उच्च तापमानाला सदरचे आरडीएफ मटेरिअल इंधन म्हणुन वापरले जाते.वेस्ट टू एनर्जी प्रकल्पामधुन वेस्ट मटेरिअल वापरुन वीजेची निर्मिती केली जाते.याबाबत दिल्ली शहरामध्ये जिंदाल कंपनीमार्फत चालु असलेल्या प्रकल्पाची कडोमपाच्या अधिक-या समवेत समक्ष पाहणी केली असता सदर प्रकल्पामधुन कमीत कमी प्रदुषण होत असुन निगेटीव्ह प्रेशर मुळे कच-यास वास आजु बाजुच्या परिसरला होत नसल्याने आढळुन आले.तसेच या प्रक्रिये अंती निर्माण होणा-या राखेचाही वापर करता येणार आहे.त्यामुळे फेकण्यायोग्य मटोरिअल चे प्रमाणफारच कमी होवुन शकते.मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधीकरणा-या प्रदेशामध्ये वेस्ट टू एनर्जी प्रकल्प कार्यान्वित नाही त्यामुळे भिवंडी महानगरपालिकेस आरडीएफ मटेरिअलच्या विल्हेवाटीची समस्या भेडसावत आहे.

याबाबत कल्याण डोबिवली महानगरपालिकेने पुढाकर घेतला असुन महानगरपालिकेच्या उबर्डे येथिल घनकचरा प्रकल्पासाठी आरक्षित व ताब्यात असलेल्या जागेमध्ये बांधा,वापरा व हस्तांतरित करा यातत्वावर अशा प्रकाराचा प्रकल्प प्रस्तावित आहे

तथापि अशा प्रकारचा प्रकल्प किमान ६०० मे.टन पेक्षा जास्त क्षमतेचा असल्यासच सुसाध्य होवु शकतो.म्हणुन सदर प्रकल्पाची क्षमता १००० मे.टन ते १२०० मेट्रीक टन प्रतिदिन प्रस्तावित आहे प्रकल्प उभारणीचा कालावधी दोन वर्ष आहे.

भिवंडी मनपा मध्ये घनकच-यावर प्रक्रिया करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने तसेच त्याची विल्हेवाट लावण्यासाठी शास्त्रोक्त भरावभुमी व निर्माण होणा-या दैनंदिन कच-याच्या तुलनेत,प्रक्रिया प्रकल्प पुरेशा प्रमाणात नसल्यास या प्रकल्पा मध्ये सहभागी होवु शकतो.त्यामुळे सदर प्रकल्पाला पुरेशा प्रमाणामध्ये कचरा मिळु शकतो व प्रकल्प सुयोग्यरित्या चालु शकतो.याप्रकल्पाचे वैशिष्टय म्हणजे प्रकल्पामध्ये मिश्र कच-याचे वर्गीकरण करण्यासाठी अत्याधुनिक यंत्र वापरली जाणार आहे.सुका कचरा व ओला कचरा त्याद्वारे वेगवेळा केला जाणार आहे.सुका कचरा वीज निर्मिती प्रकल्पासाठी इंधन म्हणुन वापरला जाणार असुन ओल्याकच-या पासुन खत निर्मिती केली जाणार आहे.त्यामुळे आपल्या महानगरपालिकेचा घनकच-याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटण्यास मदत होणार आहे. महापालिकेस फक्त कच-याची वाहतुक प्रकल्पाच्या ठिकाणी करावयाची असुन निविदेमध्ये होईल त्याप्रमाणे प्रक्रिया शुल्क तसेच कल्याण-डोबिवली महानगरपालिकेस जागे पोटी रॉयल्टी अदा करावयाची आहे.

सदर प्रकल्पासाठी चर्चे विनिमय करणेसाठी दि.१/०८/२०२२ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले असता सदर बैठकी मध्ये कल्याण-डोबिवली,उल्हासनगर,भिवंडी-निजामपुर ,अंबरनाथ व कुळगाव-बदलापुर मनपाचे अधिकारी उपस्थिती होते.या बाबत सादरीकरण तसेच कल्याण-डोबिवली महानगरपालिकेच्या पत्राद्वारे खालील प्रमाणे वस्तुस्थिती विषद केलेली आहे.

➢ **<u>वेस्ट टू एनर्जी प्रकल्पामुळे होणारे फायदे.</u>**

१)आधुनिक तंत्रज्ञानामुळे भांडवली खर्चात लक्षणीय घट.
२)मिश्र कच-याचे वर्गीकरणाची आवश्यकता नसणे.
३)प्रकल्प Negative Pressure या तत्वावर डिझाईन केलेला व सर्व बाजूनी बंदिस्त असल्याने घनकच-यापासून निर्माण होणारी दुर्गंधी बाहेरील बाजूला पसरत नाही.
४)प्रकल्पामधून निघणारी राख,सिमेट बनविण्यासाठी क्रॅक्रिट पेव्हर ब्लॉक/विटा बनविण्यासाठी उपयुक्त.
५)जल,वायू व जमिनीच्या प्रदूषणात लक्षणीय घट.
६)कच-यापासून वीज निर्मिती व्दारे अर्थार्जन होवून प्रकल्प सुसाध्य.
७)पर्यावरण पुरक प्रकल्प.
८)प्रकल्पासाठी तुलनात्मक दृष्टया कमी जागेची आवश्यकता.

➢ **<u>क्लस्टर केल्यामुळे होणारे फायदे</u>**

१)एकत्रित प्रकल्प राबविल्यास भांडवली खर्चामध्ये तसेच परिचालनावरील खर्चामध्ये मोठ्या कपात.
२)जागेची बचत.
३)कमीत कमी प्रक्रिया शुल्क
४)दिर्घ कालावधीसाठी (किमान २५ वर्ष) कच-याच्या विल्हेवाटीसाठी शास्त्रोक्त पध्दतीची उपाययोजना
५)सदरचा प्रकल्प हा पीपीपी तत्वानुसार राबविण्यात येणार असल्याने महापालिकांचा भांडवली खर्च शुन्य आहे.
६)कल्याण डोबिवली महानगरपालिका त्यांच्या क्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आरक्षित असलेली व महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली १० एकर जागा प्रकल्पासाठी नाममात्र भाडे तत्वावर उपलब्ध करुन देण्यास तयार आहे.

दि.१/०८/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेस सदर प्रकल्पा मध्ये सहभागी होणेसाठी ६ वर्षाच्या कालावधीसाठी **<u>टिपीगं फि ही विनामुल्य</u>**

N-317

असणार असुन या कामासाठी कल्याण-डोबिवली महानगरपालिकेने नियुक्त ठेकेदार हा भिवंडी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील निर्माण होणारा कचरा स्वखर्चाने भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीपासुनच्या Transfer station येथुन कचरा कल्याण-डोबिवली महानगरपालिकेच्या प्रक्रिया केंद्रा पर्यंत वाहुन नेणार आहे.

भिवंडी मनपाकडे याकामासाठी शहरात गोळा झालेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करिता इतर कोणतीही योग्य जागा नसल्याने पर्यायी जागा उपलब्ध होई पर्यंत कचरा विल्हेवाटाचा गंभीर प्रश्न निर्माण आहे.एकंदरीतच घनकचरा व्यवस्थापनांतर्गत कचरा विल्हेवाट लावणे जागा उपलब्ध झालेस हा प्रश्न मार्गी लागु शकेल,तसेच दैनंदिन स्वरुपात कचरा विल्हेवाटाची ज्वलंत प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लागेल तसेच सद्यास्थितीत भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेस हरित न्यायधिकारणा मार्फत कचरा प्रक्रिया व इतर बाबीसाठी मनपास नोटीस लागु करण्यात आली आहेत त्या दृष्टीने कल्याण-डोबिवली महानगरपालिके मार्फत उभारण्यात आलेल्या वेस्ट टू ऐनर्जी या प्रकल्पा मध्ये सहभागी होणेसाठी धोरणात्मक निर्णय आहे. याकरिता सद्यास्थिती मा.महासभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती.

प्रशासकिय ठराव क्र. 94 दि. 24/8/२०२२

कल्याण-डोबिवली महानगरपालिके मार्फत उभारण्यात येणा-या वेस्ट टू एनर्जी या प्रकल्पा मध्ये सहभागी होणे बाबत.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ(१अ)व १(ब) च्या तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (महासभा व स्थायी समितीचे अधिकार) मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,कल्याण-डोबिवली महानगरपालिके मार्फत उभारण्यात येणा-या वेस्ट टू एनर्जी प्रकल्पा मध्ये सहभागी होणेसाठी भिवंडी मनपास ६ वर्षाच्या कालावधीसाठी <u>**टिपींगं फि ही विनामुल्य**</u> असल्याने कल्याण-डोबिवली महानगरपालिके मार्फत नियुक्त ठेकेदार हे भिवंडी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील निर्माण होणारा सर्व कचरा स्वखर्चाने भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीपासुनच्या Transfer station येथुन सर्व कचरा कल्याण-डोबिवली महानगरपालिकेच्या प्रक्रिया केंद्रा पर्यंत वाहुन नेणार असल्याने या तत्वावर कल्याण-डोबिवली महानगरपालिके मार्फत उभारण्यात येणा-या वेस्ट टू एनर्जी प्रकल्पा मध्ये सहभागी होणेसाठी मान्यता देण्यात येत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**